**केंद्रीय माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ च्या कलम ४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) खालील १७ बाबींवरील माहिती.**

| मुद्दा क्र. | मुद्दा | सचिवालय जिमखान्याची माहिती |
|---|---|---|
| १ | सचिवालय जिमखान्याची रचना, कार्य व कर्तव्य याचा तपशील | **शासकीय संस्थेचे नाव - सचिवालय जिमखाना, मुंबई**<br>**संस्था नोंदणी अधिनियम १८६०** - नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य, मुंबई ७७९-१९९७ जी.बी.बी.एस.बी<br>**सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५०**- नोंदणी क्र. एफ २४७३८ (मुंबई)<br>**पत्ता:** सचिवालय जिमखाना, ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२<br>सचिवालय जिमखान्याचे "पदसिद्ध अध्यक्ष" हे मा.मुख्यमंत्री व "पदसिद्ध उपाध्यक्ष"हे मा. मुख्य सचिव असतात. सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीमध्ये जास्तीत जास्त १५ सदस्य असतात, त्यापैकी १२ सदस्य हे निवडून आलेले असतात आणि सचिवालय जिमखाना नियमावलीतील नियम 21 (A) अन्वये, कार्यकारी समितीची निवडणूक लढविण्यास पात्र असणाऱ्या अधिकतम ३ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात येते. क्रीडा, संगीत, नृत्य, नाटक, गिर्यारोहण आणि इतर क्रीडा प्रकारासाठी विविध सुविधा सचिवालय जिमखान्याच्या सभासदांना उपलब्ध करुन देणे. तसेच विविध स्पर्धा व कार्यक्रम आयोजित करुन खेळाचा विकास करणे व खेळाडूंना प्रोत्साहन देणे हे जिमखान्याचे महत्वाचे कार्य आहे.<br>सचिवालय जिमखान्याची रचना तसेच क्रीडा व कला प्रकारासाठी नियुक्त केलेले सचिव याबाबतची माहिती, सोबत **विवरणपत्र -१ व २** मध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात आली आहे. |
| २ | सचिवालय जिमखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | १. सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीनुसार नियमित व कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी व्यवस्थापकीय सदस्यांशी विचारविनिमय करुन त्यांना सोपविलेल्या जिमखान्याचे कामकाज पाहणे.<br>२. सचिवालय जिमखान्याच्या कार्यालयीन कामकाजाचे व्यवस्थापन करणे, समिती व पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करणे, जिमखानाच्या वतीने शासन व इतर संस्थांशी पत्रव्यवहार करणे, व्यवस्थापकीय समिती सदस्य यांनी वेळोवेळी नेमून दिलेली अन्य कामे करणे, जिमखाना आवार व सफाई कामावर देखरेख ठेवणे.<br>३. सचिवालय जिमखान्याच्या कला व क्रीडा गुणांना सतत प्रोत्साहन देऊन नवनवीन उपक्रम हाती घेऊन सचिवालय जिमखान्याचा उत्कर्ष साधण्यासाठी व्यवस्थापकीय |

| | | |
|---|---|---|
| | | समितीला सहाय्य करणे.<br>४. जिमखान्याच्या सभासदांच्या विविध मागण्यासंदर्भात शासन स्तरावर पाठपुरावा करणे.<br>५. केद्र शासनाच्या विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने सचिवालय जिमखान्यामार्फत अखिल-भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन करणे आणि जिमखान्यातर्फे विविध कला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे व वार्षिक संमेलनाचे आयोजन करणे, इत्यादी कामात व्यवस्थापकीय समितीला सहाय्य करणे. |
| ३ | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली | सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीतील (By Laws) नियमानुसार कामकाज करण्यात येते. |
| ४ | स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी जिमखान्याकडून ठरविण्यात आलेली मानके | सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीनुसार (By Laws) कामकाज करण्यात येते. |
| ५ | जिमखान्यांकडे असलेले किंवा जिमखान्याच्या नियंत्रणात असलेले किंवा जिमखान्याची कार्ये पार पाडण्यासाठी जिमखान्यातील कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना नियमपुस्तिका आणि अभिलेख | सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीतील (By Laws) तरतूदी व जिमखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांना सोपविण्यात आलेल्या जबाबदारीनुसार कामकाज हाताळण्यात येते. |
| ६ | जिमखान्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्त ऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण | वार्षिक अहवाल, अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांचे अहवाल, इत्यादी. |
| ७ | जिमखान्यातील धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील | जिमखान्याच्या विकास किंवा अन्य मागण्याबाबत सभासदांची निवेदने आल्यास याबाबत व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीत विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात येतो. |
| ८ | जिमखान्याचा एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून गठीत केलेल्या २ किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे, याबाबतचे विवरण | सचिवालय जिमखान्याकडून कोणतीही सार्वजनिक समिती, परिषद अथवा मंडळ गठीत करण्यात आलेली नाही. |
| ९ | जिमखान्यातील अधिका-यांचे व कर्मचा-यांची निर्देशिका | सचिवालय जिमखान्यातील नियमित व कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांची यादी सोबत **विवरणपत्र-3** मध्ये दर्शविण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १० | जिमखान्यातील प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पद्धती. | सचिवालय जिमखान्याच्या आस्थापनेवरील व्यवस्थापक, लेखापाल, लिपीक-टंकलेखक, शिपाई, यांना देण्यात येणारे मासिक वेतन सोबत **विवरणपत्र-3** मध्ये दर्शविण्यात आले आहे. |
| ११ | सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा,आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि कार्यक्रमाच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील | केंद्रीय नागरी सेवा क्रीडा व सांस्कृतिक बोर्ड, नवी दिल्ली यांच्या विद्यमाने व महाराष्ट्र शासनाच्या वतीने अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्याचा संघ सहभाग घेत असतो. याकरिता खेळाडूसाठी निधी हा महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाकडून उपलब्ध होत असतो.<br>जिमखान्याच्या विविध क्रीडा व कला प्रकारासाठी दरवर्षी ठराविक रक्कम मंजुर करण्यात येते व याबाबतच्या खर्चाचा तपशील वार्षिक अहवालामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात येतो. |
| १२ | ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत, अशा व्यक्तींचा तपशील | सचिवालय जिमखान्याच्या आजिव सभासदांना जिमखान्याच्या भाडयामध्ये जास्तीत जास्त २ वेळा सवलत देण्यात येते.<br>सचिवालय जिमखान्यात सेवानिवृत्त होणाऱ्या आजिव सभासदांना त्यांच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमासाठी कै. सुधीर अवचट सभागृह एक वेळा विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येते. जिमखान्यातील सभासदांना ग्रंथालय, व्यायामशाळा तसेच इतर खेळ व कला प्रकाराच्या सुविधा माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येतात. |
| १३ | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात जिमखान्याकडे उपलब्ध असलेल्या किंवा जिमखान्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील. | सचिवालय जिमखान्याचे संकेत स्थळ असून त्यावर वार्षिक अहवाल व इतर क्रीडा विषयक माहिती संकेतस्थळावर (www.sachivalayagymkhana.com) प्रसिध्द करण्यात येते. |
| १४ | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील | नागरिकांना माहिती मिळविण्यासाठी ते सचिवालय जिमखान्याच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते सायं.७.०० या वेळेत येऊन माहिती उपलब्ध करुन घेऊ शकतात. तसेच सचिवालय जिमखान्याच्या www.sachivalayagymkhana.com या संकेतस्थळावर असलेली माहिती उपलब्ध करुन घेऊ शकतात.<br>जिमखान्यामार्फत ग्रंथालय व वाचनालयाची सुविधा सर्व सभासदांना माफक दरात उपलब्ध करुन देण्यात आली असून, त्याची वेळ सकाळी ११.०० ते सायं.७.०० पर्यन्त आहे. |
| १५ | जन माहिती अधिका-यांची नांवे, पदनामे व इतर तपशील | व्यवस्थापक - जनमाहिती अधिकारी व<br>मानद महासचिव -अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहेत. |
| १६ | विहीत करण्यात येईल अशी इ तर माहिती. | कला व क्रिडाविषयाबाबतची आवश्यक माहिती सचिवालय जिमखान्याच्या www.sachivalayagymkhana.comया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सोबतच्या विवरणपत्रांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |